
2231-573X
Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



## लोककवी वामनदादा कर्डक

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

## लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक (भाग-३)

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. युवराज धबडगे — प्रा. नागेश बोन्तेवाड

मराठी विभागप्रमुख — मराठी विभाग

दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज, जि. औरंगाबाद

● संपादक मंडळ ●

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागूल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. संजय सांभाळकर
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने

मूल्य : ३०० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

Estd. 1983


PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

| | | |
|---|---|---|
| 46. | वामनदादा कर्डक यांच्या गीतकाव्यातून प्रकटणारे क्रांतीदर्शी विचार<br>- प्रा. ज्ञानेश्वर गो. मुंढे | 196 - 199 |
| 47. | लोककवी वामनदादा कर्डक यांची राष्ट्रीय कविता व राष्ट्रवाद<br>- प्रा. डॉ. विलास गायकवाड | 200 - 203 |
| 48. | वामनदादा कर्डक यांच्या काव्यगीतातील सामाजिक प्रबोधन<br>- किरण केशवराव पांचाळ | 204 - 207 |
| 49. | लोककवी वामनदादा कर्डक यांची समताधिष्ठित विचार मांडणारी कविता<br>-पांडुरंग दत्तु आंधळे | 208 - 212 |
| 50. | वामनदादा कर्डकांच्या साहित्यातील मूल्यनिष्ठा<br>- मीरा गोपीनाथ थोरात | 213 - 216 |
| 51. | वामनदादांच्या काव्यातील भिमाई : एक अभ्यास<br>- डॉ. राजीव यशवंते | 217 - 219 |
| 52. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील बौध्द तत्वज्ञान<br>- प्रा. डॉ. सुधाकर नवसागर | 220 - 223 |
| 53. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा. डॉ. संतोष जगन्नाथ जाधव | 224 - 228 |
| 54. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- प्रा. डॉ. सिंधू बाबाराव सोलापूरे | 229 - 232 |
| 55. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील परिवर्तनवादी आंबेडकरी विचार<br>- प्रा. डॉ. कांत वसंतराव जाधव | 233 - 237 |
| 56. | वामनदादा कर्डक यांच्या काव्यगीतातील आंबेडकरी तत्वविचार<br>- डॉ. सुधाकर सिताराम चौधरी | 238 - 241 |
| 57. | वामनदादा कर्डक यांच्या गीतांतील सामाजिक आशय<br>- प्रा.डॉ. अनिल एस. कांबळे | 242 - 244 |
| 58. | लोककवी वामनदादांच्या गीतांमधील अस्पृश्यता आणि जातियतेचे संदर्भ<br>- डॉ. सखाराम डाखोरे | 245 - 248 |
| 59. | लोकशाहीर वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी | 249 - 253 |
| 60. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेची स्वरूपवैशिष्ट्ये<br>- डॉ. एम. ए. कळके | 254 - 256 |



Co-Ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511, (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani



# वामनदादांच्या काव्यातील भिमाई : एक अभ्यास

- डॉ. राजीव यशवंते
मराठी विभाग,
गुरू बुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा (जं)
ता. पूर्णा (जं) जि. परभणी - 431511
भ्रमणध्वनी क्र. +918788284621

---

वामनदादा कर्डक यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात देशवंडी या गावात 15 ऑगस्ट 1922 साली झाला. वडील आणि आई सईबाई यांना वामनसह सदाशिव आणि सावित्री अशी तीन मुले होती. वामन दादांना लहान वयातच समाज यांची गाणी कानावर पडून त्यांना गाण्यांनी मोहिनी घातली वामनदादा लहान असतानाच गावात गळ्यात संबळ अडकून फिरत असत. त्याच वयात असताना नाशिक येथे शाहीर घोंगडे यांचा पोवाडा संवेदनशील मनाला थरारून गेला. तेथून खऱ्या अर्थाने वामनदादांच्या जीवनात गाण्याने प्रवेश केला पण वास्तवात वामनदादाने 1943 सालापासून गीत लेखनाला प्रारंभ केला. वामनदादांच्या जीवनात गरिबीमुळे अनेक चढउतार आले पण त्यांच्या मनातील गाण्याची जिद्द कमी होऊ शकली नाही. कालांतराने आई-वडिलांसोबत वामनदादाला मुंबईला जावे लागले. वामनदादा आई-वडिलांसोबत कोळसा वेचण्याचे काम करून कुटुंबाला हातभार लावत असत. सायनवरून पुढे वामनदादाच्या कुटुंबाला शिवडीला जावे लागले. येथे गिरणीत काम करत असतानाच गिरणी बंद पडली. त्यामुळे पडेल ते काम करून उदरनिर्वाह करावा लागला. याच काळात त्यांनी आईस्फ्रुट विकणे, चिकी विकणे आणि आईबरोबर खडी फोडण्याचे कामही केले. पुढे वामन दादांना टाटा ऑइल मिलमध्ये नोकरी लागली त्यामुळे याच काळात वामनदादाचे अनुसया नावाच्या मुलीशी लग्न झाले आणि शिवडीच्या बीडीडी चाळीत वामनदादाचा संसार सुरू होऊन त्यांना मीरा नावाची मुलगी झाली. पुढे वामन दादाची पत्नी मृत्यू पावली आणि काही काळातच मुलगी मरण पावली. त्यामुळे वामनदादाने समता सैनिक दलात कामास प्रारंभ केला. तेथे त्यांनी लेझीम आणि काठीचे शिक्षण घेतले. शाळेतील मुलांना शिक्षण देत वामनदादा मास्तर म्हणून ओळखले जाऊ लागले, पण पत्र वाचण्याच्या प्रसंगावरून वामन दादांना आपण अशिक्षित आहोत याचे अपार दुख झाले. त्यातूनच त्यांनी देहवली साहेबांच्या मदतीने आणि प्रेरणेने वामन दादांनी लिहायला-वाचायला प्रारंभ केला. लेखन-वाचन झपाट्याने वाढवून वामनदादा जाणते झाले. मराठी आणि हिंदीचे खूप वाचन करून त्यांना याच काळात चित्रपट सृष्टीचे वेड लागले. त्याने तेही काही काळ काम केले तेथेच 1943 साली त्यांनी एका हिंदी गीताचे विडंबन केले आणि वामन दादांना नवे जगणे सापडले आणि पूर्वीच्या गायणाशी त्यांचे आपसूकच नाते जडत गेले

येथूनच पुढे वामनदादाच्या जीवनात गीतलेखन आणि गायनाला जागा घेऊन हे आंबेडकरी शाहीर झाले. प्रस्तुत शोधनिबंधाचे अनुषंगाने वामनदादांच्या काव्यातून बाबासाहेब आंबेडकरांच्याप्रती असलेली माया [illegible] भिमाई या प्रतिमेच्या

Co-ordinator

PRINCIPAL
[illegible] Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

रूपाने व्यक्त झालेली आहे ते संबोधन वामन दादांनी कशा पद्धतीने वापरले याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. वामनदादांच्या संदर्भाने आंबेडकरी साहित्यिक डॉक्टर यशवंत मनोहर यांचे अत्यंत महत्वाचे आहे असे वामनदादा हे प्रतिभावंत गीतकार आहे ते आंबेडकरवादी गीतकार म्हणून प्रख्यात आहे या आंबेडकरी जाणिवेच्या निर्मिती करा आंबेडकर यांनीकेलेले क्रांतिकार्य आणि या क्रांतिकार्यामागे उभे असलेले तत्वज्ञान हेच आहे[1] वामनदादाचे गीत अडचणीच्या आणि त्यांच्या संदर्भाने व्यक्त केलेल्या वरील विवेचनात वामनदादांच्या गीतातून व्यक्त झालेली आंबेडकर इज आणि आणि बाबासाहेबांच्या प्रतीची फळवणी हीच खऱ्या अर्थाने वामनदादांच्या गीताची प्रेरणा आहे आहे

मराठी संत साहित्यात विठ्ठलाप्रती पांडुरंगा प्रती जशी संताने विठाई या नावाने आळवणी केली तसेच आळवणी वामनदादा आणि बाबासाहेबांच्या प्रती भीमा या नावाने करून बाबासाहेबांच्या प्रती असलेल्या प्रतिमेचा उत्कटता अधिक गहिरी करून अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे वामनदादा बाबासाहेबांच्या महान कामगिरीचे वर्णन करताना त्यांच्याबद्दलची भावना व्यक्त करताना म्हणतात -

तुझीच कमाई आहे ग भिमाई
कुणाचेच काही इथे कष्ट नाही
दारात काला आली माझीच भिमाई
आईचा हात झाली माझीच भीमाई
सारे उपास पोटी उचलून घेतले
साऱ्यांची माय झाली माझीच भिमाई

बाबासाहेबांमुळे दीनदलितांच्या जीवनात नवचौतन्य तर आलेच पण बाबासाहेबांनी या समाजाला आईचे प्रेम दिलेही भावनाच सर्व काही सांगून जाते पण बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर मात्र हा दलित समाज पोरका झालाबाबासाहेबांच्या नंतर त्यांनी स्थापन केलेल्या पक्षात फाटाफूट झाली ही आर्ततेने आलेली भावना वामनदादा व्यक्त करताना म्हणतात -

चालवेना मार्ग, आले फोड पाया
ये ग भिमाई उचलून घ्याया
कुणी साथ ना दे कुणी हात ना दे
उचलून मजला आपल्या कुशीमध्ये ना घे

बाबासाहेब आंबेडकर यांच्या मृत्यूने समाज तर पोरका झाला पण तत्कालीन काळात लिहिणारे कवी शाहीर बाबासाहेबांच्या जाण्याने हातास शोकाकुल होऊनलिहू लागले त्यात आघाडीवर होते ते लिहितात-

समाधीकडे त्या वाटही वळाली
तिथे आसवांची फुले ही गळावी
लाविता समाधी समाधी सामोरी
दशा या जीवाची आईला कळावी

बाबासाहेबांच्या कार्य आणि कर्तृत्वाचे वर्णन करताना वामनदादांच्या प्रतिभेला नवे अंकुर फुटतात त्यांची प्रतिभा बाबासाहेबांच्या प्रेरणेने ओथंबून ओसंडून वाहताना दिसतेते पुढे एका कवितेमध्ये म्हणतात

पहाट झाली प्रभा मनाली भीम जयंती आली
चांदाची चांदनीयेऊन खाली वारा भिमाला घाली

वामनदादांची शब्द आणि प्रतिमा म्हणजे एक खजानाच आहे. प्रत्येक वेगवेगळ्या प्रतिमांमधून बाबासाहेबांच्याप्रतीची ममत्वाची / प्रेमाची भावना उत्कटतेकडे नेणारी प्रतिमासृष्टी उभी करतात..वामनदादा कर्डक यांच्या कविते संदर्भात आणि आंबेडकरी कविते संदर्भात हे गीत वामनाचे या ग्रंथाच्या प्रस्तावनेत [illegible] जाधव म्हणतात, 'आंबेडकरी जलसे हे संगीत जलसे होते जलसाकार हेही कवी होते. स्वातंत्र्योत्तर पिढीतील कवी गायक [illegible]कारांनी बाबासाहेबांना 'भीमा' असे संबोधिले आहे.[2] खरोखरच बाबासाहेब आंबेडकरांना स्वातंत्र्योत्तर काळ शाहीर गायक तसेच सामान्य जनता [illegible] माऊली भिमाई

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya



PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

अशा शब्दांमधून आळवणी युक्त प्रतिमांमधून बाबासाहेबांच्याप्रतीची ममत्व भावना व्यक्त करताना दिसतात बाबासाहेब आंबेडकरांना 'बाबा' म्हणून संबोधणारी जनता या जगात अन्यत्र कुठेही सापडणार नाही. भारत भूमीवर आजही तेवढ्याच आदरयुक्त भावनेने बाबासाहेबांना 'बाबा' म्हणणारा जनसमुदाय मोठ्या प्रमाणावर या देशातच नाही तर विदेशातही सापडेल. एवढी लोकप्रियता लाभलेले बाबासाहेब आंबेडकर एकमेव होतं.वामनदादाने कितीतरी कविता बाबासाहेबांच्या बद्दलचे प्रेम, ममत्व वेगवेगळया प्रतिमांच्या माध्यमातून व्यक्त केलेले आहे

उदा. :

पेर भिमाचा लळा, शिवारी पेर भीमाचा लळा रे
काय सांगू तुला वामन भीम माझाकुळा होता
सात ठिकाणांच्या बंडीला भीम माझा खिसा होता

किंवा

माय भीमाई माऊली जशी आंब्याची सावली
स्वत: राहिली उन्हात उभी आम्हाले केली सावली[3]

वामन दादांनी आपल्या एकूणच काव्यातून बाबासाहेबांच्या प्रतीची ममत्वाची भावना व्यक्त करताना विविध प्रतिमांच्या माध्यमातून व्यक्त केलेली आहे. म्हणूनच असं म्हटलं जातं बाबासाहेबांच्या प्रतीची भावना व्यक्त करणारं साहित्य हे एकमेव साहित्य आहे. जगाच्या पाठीवर एवढं प्रेम लावलेला महापुरुष कदापिही नसेल म्हणूनच बाबासाहेबांना'बाबा' हे संबोधन जनसामान्य माणसांनी बहाल केले. वामनदादांच्या गंगाधर पानतावणे म्हणतात-

'वामनराव यांची गीते म्हणजे आंबेडकरी चळवळीचा इतिहास होय लोक जीवनाशी एकरूप होऊन बाबासाहेबांचा आत्म जागृतीचा संदेश वाहून नेणे हे त्यांनी आपल्या जीवनाचे आद्यकर्तव्य मानले आहे.'[4]

खरोखरच वामनदादांची गीते ही आंबेडकरी चळवळीचा इतिहास तर आहेतच पण जनसामान्यांच्या मनाला चटका लावणारी त्यांना चिंतनशील बनवणारी, भावनेला हात घालणारी गीतं वामनदादानी मराठी साहित्याला दिली.

**निष्कर्ष :**

1) वामनदादांनी बाबासाहेब आंबेडकर नावाच्या सूर्यानुसारच गतकालीन प्रंबोधनपर उजेडाचा शोध घेतला
2) वामनदादानी आंबेडकरी जाणीवेच्या गीता बरोबरच राष्ट्रीय जाणिवेचे गीतेही लिहिली.
3) वामनदादा कर्डक प्रतिभावंत आंबेडकरवादी गीतकार आहेत
4) वामन दादानी बाबासाहेब आंबेडकरांना भिमाई या नावाने संबोधून गीतलेखन केले

**सारांश :**

वामनदादा कर्डक यांची कविता समाजातील तुटलेले दुवे सांधणारी कविता आहे ती समाजाला कळवळून सांगताना दिसते. या कळवळीमागे कवीचे आर्द्र मन आहे.आपले भले आपल्या मोठीच आहे एक दिलाचा एक भेटीत आहे अक्षय प्रमाणे बाबासाहेबांनी समाज घरटे रचलेली आहे म्हणून वामनदादा बाबासाहेबां प्रतींची आळवणी भिमाई या संशोधनातून व्यक्त करून त्यांच्या प्रतीची उत्कट भावना प्रतिमानमधून अधिक उत्कट करताना दिसतात.

सारी भिमाईची बाळं, एकतेची गुंफा माळं, बाई गं बाई ती भीमाई आता नाही. अशा कितीतरी काव्यातून बाबासाहेबांच्या प्रतीचा कळवळा बाबासाहेबांची उणीव त्यांना भासत राहते वामनदादा आपल्या प्रबोधनात्मक काव्यातून अभिव्यक्त होताना बाबासाहेबां प्रतींची भावना प्रतिमामधून अधिकाधिक उत्कट होत जाते.

**संदर्भ टीपा**


1) मनोहर डॉ.यशवंत - आंबेडकरवादी महागीतकार,युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, 2005, पृ. 13
2) भास्कर जाधव - हे गीत वामनाचे , दलित श्रमिक प्रकाशन, अहमदनगर, 1197, पृ. 10
3) कर्डक वामन - मोहोळ, श्रद्धा सहकारी प्रकाशन संस्था कल्याण, जिल्हा ठाणे, 2004, पृ. 40
4) गंगाधर पानतावणे - विद्रोहाचे पाणी पेटले आहे, कांती प्रकाशन औरंगाबाद, 2001, पृ. 122
5) किरवले कृष्णा - आंबेडकरी शाहिरी : एक शोध, नालंदा प्रकाशन, कोल्हापूर


◆◆◆◆

Co-ordinator
IQAC

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal
MAH MAR 34737/13/1/2009-TC



माणसा इथे मी तुझे गीत गावे
असे गीत गावे तुझे हीत व्हावे ।।धृ।।

असे गोड नाते तुझ्याशी जडावे
तुझ्या संकटाशी इथे मी लढावे ।।१।।

तुझ्याच भुकेचे कोडे उलगडावे
तुझे दु:ख सारे गळूनी पडावे ।।२।।

एकाने हसावे लाखाने रडावे
जुने सारे सारे असे ना उरावे ।।३।।

इथे सारे सारे नवे पेरताना
वामनापरी मी तुझे हात व्हावे ।।४।।

लोककवी वामनदादा कर्डक

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक, शिवाजी हुसे [illegible] ऑफसेट, सिडको, औरंगाबाद येथे छापून